# पर्यावरणाबाबत जागृती करा



युवकांशी संबंधित कोणत्याही क्षेत्रातील धोरण आखताना सर्वंकष विचार केला जावा अशी अपेक्षा आहे. विकास साधताना प्रत्येक युवकाच्या मनात पर्यावरणाची जोपासना करून तो कसा साध्य करता येईल याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. यासाठी राज्य सरकारच्या धोरणांमध्ये पर्यावरणाविषयी तरुणांच्या मनात कायम जागरूकता राहील अशा योजना आखणे गरजेचे आहे.

शालेय जीवनापासून मुलांच्या मनात पर्यावरणाविषयी जागृती केल्यास हे शक्य होईल. युवकांमध्ये पर्यावरणाची जाणीव होण्याच्या दृष्टीने कला शाखेमध्ये या विषयाचा समावेश केला आहे; मात्र शिक्षक अपुरे आहेत. अभ्यासक्रम आखतानाच सर्व पायाभूत, भविष्यातील संधींचा विचार केल्यास या समस्या उद्भवणार नाहीत. शहरात मिळणाऱ्या संधी ग्रामीण भागात नसल्याने तेथील तरुण शेती सोडून शहराकडे वळत आहे. या तरुणाला स्थानिक पातळीवर शेतीचे महत्त्व, उत्पादनवाढीसाठी तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिल्यास, रोजगाराची संधी दिल्यास शहरी भागात स्थलांतरामुळे येणारा ताण कमी होईल. शहराच्या बरोबरीने ग्रामीण भागाचे पुनरुज्जीवन होईल.

**– केतकी घाटे, पुणे**